# FIRST INFORMATION REPORT
**(Under Section 154 Cr.P.C.)**
**प्रथम खबर अहवाल**
**(कलम १५४ फौजदारी प्रक्रिया संहिता)**

1. **District (जिल्हा):** उस्मानाबाद **P.S.(ठाणे):** तामलवाडी
**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0030 **Year (वर्ष):** 2023
**Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):**02/03/2023 22:33

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |

3. **(a) Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**
1. **Day(दिवस):** गुरुवार
**Time Period (कालावधी):**
**Date From (दिनांक पासून):** 02/03/2023
**Date To ( दिनांक पर्यंत):** 02/03/2023
**Time From (वेळेपासून):** 11:46 बजे
**Time To (वेळेपर्यंत):** 14:16 बजे

**(b) Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**
**Date (दिनांक ):** 02/03/2023 **Time (वेळ):** 22:00 बजे

**(c) General Diary Reference (रोजनामचा संदर्भ ):**
**Entry No. (नोंद क्र.):** 022
**Date & Time (दिनांक आणि वेळ):** 02/03/2023 22:23 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी
5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**
1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):**
पश्चिम, 1 किमी **Beat No. (बिट क्र.):**
(b) **Address (पत्ता):** सावरगाव,तुळजापुर

(c) **In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**
**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**
**District(State) (जिल्हा(राज्य)):**



Scanned with CamScanner

**6. Complainant / Informant (तक्रारदार/माहिती देणारा):**

(a) **Name (नाव):** पांडुरंग गणपती राऊत

(b) **Father's/Husband's Name(वडील / पती चे नाव) :**

(c) **Date/Year of Birth (जन्म तारीख/वर्ष):** 1972

(d) **Nationality (राष्ट्रीयत्व):** भारत

(e) **UID No. (यु.आय.डी. क्र.):**

(f) **Passport No.(पारपत्र क्र.):**

**Date of Issue (दिल्याची तारीख):**

**Place of Issue (दिल्याचे ठिकाण):**

(g) **ID details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License, PAN) ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )**

| S.No. (अ.क्र.) | ID Type (ओळखपत्राचा प्रकार) | ID Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address (पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | केमवाडी ,तुळजापुर ,तामलवाडी ,उस्मानाबाद,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | केमवाडी ,तुळजापुर ,तामलवाडी ,उस्मानाबाद,महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation (व्यवसाय):**

(j) **Phone number (फोन नं.):**

**Mobile (मोबाइल नं.):**

**7. Details of known/suspected/unknown accused with full particulars (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | रविंद्र दत्तात्रय अंदाने | | | 1. विजापुर रोड सोलापुर,उत्तर सोलापुर ,सोलापुर शहर, महाराष्ट्र,भारत |

**8. Reasons for delay in reporting by the complainant/informant (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):**

**9. Particulars of properties of interest (संबंधीत मालमत्तेचा तपशील):**

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रु. |
|---|---|---|---|---|
| 1 | नाणे आणि चलन | भारतीय- रुपया | दहा हजार रुपये(10,000) | 10,000.00 |



Scanned with CamScanner

**10 Total value of property (In Rs/-)**
**(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):**

10,000.00

**11. Inquest Report / U.D. case No., if any**
**(इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):**

| S.No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

**12. First Information contents (प्रथम खबर हकीकत ):**

मी पांडुरंग गणपती राऊत, वय 51 वर्ष, व्यवसाय शेती, रा. केमवाडी, ता. तुळजापुर जि.उस्मानाबाद मोबाईल नंबर 9922203639.
काल दिनांक 01.03.2023 रोजी मी लाचलुचपत प्रतिबंधक कार्यालय, उस्मानाबाद येथे हजर राहुन तक्रार दिली त्यातील थोडक्यात हकिगत अशी की, " दिनांक 09.01.2023 रोजी मौजे केमवाडी शिवारातील माझे नावावर असलेल्या शेत गट क्र. 341 मधील क्षेत्र 2 हेक्टर 83 आर. पैकी 1 हेक्टर पत्नी शिला राऊ त व 1 हेक्टर मुलगा अभिषेक राऊ त यांचे नावे रजिष्टरी नोटरी करुन संमतीपत्र लिहुन दिले होते.
आमचे गावास व सावरगाव या गावास एकच तलाठी असुन त्यांचे नाव अंदाने असे आहे. तलाठी श्री. अंदाने हे सावरगाव येथे सज्जावर असतात. मी रजिष्टरी नोटरी करुन दिलेल्या संमतीपत्राप्रमाणे फेरफारला (खातेफोड) नोंद घेण्यासाठी गेले तिस - पस्तीस दिवसापुर्वी आमचे गावचे तलाठी श्री. अंदाने यांची सावरगाव येथे जावुन भेट घेतली व त्यांना पत्नी शिला व मुलगा अभिषेक यांचे नावे रजिष्टरी नोटरी केलेले संमतीपत्र देवुन त्याआधारे फेरफारला (खातेफोड) नोंद घेण्यासाठी विनंती केली. त्यावेळी त्यांनी माझा अर्ज म्हणुन एका को-या कागदावर माझी सही घेतली व मला त्यांचे हाताखाली काम करणारा खाजगी ईसम रमेश भालेकर रा. सावरगाव यांची भेट घेण्यास सांगीतले. त्यावरुन मी रमेश भालेकर यांची भेट घेतली असता ते मला तुमचे काम असे होणार नाही, साहेबाला काहीतरी दयावे लागेल असे म्हणाले. तेव्हा मी त्यांना काय दयावे लागेल असे म्हणुन विचारले असता ते मला साहेबाला विचारुन सांगतो असे म्हणाले.
त्यानंतर पाच सहा दिवसांनी मी सावरगाव येथे जावुन भालेकर यांची भेट घेतली व त्यांना माझे फेरफार (खातेफोड) नोंदीचे काय झाले म्हणुन विचारले असता त्यांनी मला साहेबांनी तुमच्याकडुन 15,000/- रुपये घेण्यास सांगीतले आहेत. तुम्ही साहेबाला 15,000/- रुपये दया म्हणजे साहेब तुमचे काम करुन देतील असे म्हणाले.
गेले आठ दिवसापुर्वी मी तलाठी श्री. अंदाने यांची सावरगाव येथे जावुन भेट घेतली व त्यांना माझे कामासंबधी बोललो असता ते मला तुम्ही भालेकर यांची भेट घेतली नाही का? मी भालेकर जवळ काय ते सांगीतले आहे असे म्हणाले. तेव्हा मी त्यांना भालेकरची भेट घेतली होती त्यांनी मला आपल्याला 15,000/- रुपये दयायचे सांगीतले आहेत असे म्हणालो. त्यावर तलाठी श्री. अंदाने हे मला त्यांनी तुम्हाला बरोबर सांगीतले आहे असे म्हणाले. तेव्हा माझे लक्षात आले की, तलाठी श्री. अंदाने यांना 15,000/- रुपये दिल्याशिवाय ते माझे काम करणार नाहीत. त्यामुळे मी त्यांना काहीतरी करतो असे म्हणुन त्यांचेपासुन निघुन माझ्या गावी गेलो." वगैरे मजकुरची तक्रार संपते साहेब, पोलीस उपअधीक्षक, ला.प्र.विभाग, उस्मानाबाद यांच्याकडे दिली. त्यांनी माझी तक्रार लॅपटॉपवर टंकलिखित करुन घेतली व त्याची एक प्रिंट काढल्यानंतर ती मला वाचण्यास दिली. माझी टंकलिखित केलेली तक्रार व मी तोंडी सांगितलेली तक्रार एकच असल्याची खात्री झाल्यानंतर मी व संपते साहेब यांनी त्यावर सहया केल्या.
मी दिलेल्या तक्रारी प्रमाणे संपते साहेब यांना दिनांक 02.03.2023 रोजी सुरतगाव फाटयाजवळ येण्यास सांगीतले. त्यावरुन आज दिनांक 02.03.2023 रोजी संपते साहेब हे माझ्याशी फोनवर संपर्क करुन त्यांचा स्टाफ व दोन शासकीय पंचासह त्यांचेकडील खाजगी वाहणाने सुरतगाव फाटयाजवळ आले. तेथे एका सुरक्षीत ठिकाणी संपते साहेब यांनी माझा व त्यांचे सोबत असलेले पोलीस अंमलदार आणि दोन शासकीय पंच यांचा आपसी परिचय करुन दिला. त्यानंतर पोलीस उप अधिक्षक संपते साहेब यांनी मला कळविले की, माझ्या तक्रारीचे अनुषंगाने तलाठी श्री. अंदाने, सज्जा सावरगाव अतिरीक्त कार्यभार केमवाडी हे माझी पत्नी व मुलगा यांचे नावे रजिष्टरी नोटरी केलेल्या संमतीपत्राआधारे फेरफारला (खातेफोड) नोंद घेण्यासाठी माझ्याकडे लाचेची मागणी करतात अगर कसे ? याकरिता तलाठी श्री. अंदाने हे मंडळ अधिकारी कार्यालय, सावरगाव येथे बसत असलेल्या ठिकाणी त्यांची पंचासमक्ष लाचमागणी पडताळणी करण्यात येणार असल्याबाबत खुलासा करुन लाचमागणी पडताळणी दरम्यान तलाठी श्री. अंदाने यांची लाचेची मागणी सिध्द झाल्यास लाचेचा सापळा आयोजीत करण्यात येईल असे सांगितले. तसेच त्यांनी



Scanned with CamScanner

दोन्ही पंचांची पंच म्हणुन काम करण्याची सहमती घेवुन अक्षय रमेश औरादकर, कनिष्ठ सहाय्यक, शिक्षण विभाग, जिल्हा परीषद उस्मानाबाद यांची पंच क्र. 01 व सुखदेव महादेव पांडागळे, वरिष्ठ सहाय्यक, ग्राम पंचायत विभाग, जिल्हा परिषद, उस्मानाबाद यांची पंच क्र. 2 म्हणुन नेमणुक केली.

त्यानंतर संपते साहेब यांनी मला सांगितले की, लाचमागणी पडताळणीत व्हाईस रेकॉर्डरचा वापर करण्यात येणार आहे. त्यानंतर त्यांनी पोशि/बेळे यांना दिलेल्या सुचनेप्रमाणे पोशि/बेळे यांनी सोबत आणलेल्या काळया रंगाच्या बॅगमधुन व्हाईस रेकॉर्डर बाहेर काढुन त्याबाबत मला व दोन्ही पंचाना सविस्तर माहिती देवुन त्याचे प्रात्यक्षीक करुन दाखविले व एक नवीन मेमरी कार्ड व्हॉइस रेकॉर्डरमध्ये टाकुन व्हॉईस रेकॉर्डर चालु करुन त्यामध्ये पुर्वीचे कोणतेही संभाषण रेकॉर्ड नसलेबाबत खात्री करुन दिली. त्यानंतर संपते साहेब यांनी माझे तसेच तलाठी श्री. अंदाने यांचेत होणारे संभाषण व्हॉईस रेकॉर्डरमधील मेमरी कार्ड मध्ये रेकॉर्ड होणार असले बाबत सांगितले.

त्यानंतर संपते साहेबांनी लाचमागणी पडताळणी अनुषंगाने मला सुचना दिली की, मी तलाठी श्री. अंदाने यांची मंडळ अधिकारी कार्यालय, सावरगाव ता. तुळजापुर जि. उस्मानाबाद येथे जावुन भेट घेवुन त्यांना स्वतः च्या कामासंबंधी बोलावे, दरम्यान त्यांनी लाचेची मागणी केल्यास त्यांच्याकडुन वेळ मागुन घेवुन सापळा पथक थांबलेल्या ठिकाणी परत यावे. तसेच त्यांनी पंचांनाही सापळा कार्यवाहीच्या अनुषंगाने योग्य त्या सुचना दिल्या.

त्यानंतर त्यांनी पोशि/बेळे यांना सुचना दिल्याने त्यांनी व्हॉईस रेकॉर्डर चालु करुन माझे शर्टचे आतमध्ये बनियनला पिनने लावुन मला व पंच क्रं.1 औरादकर यांना माझेकडील हिरोहोन्डा स्पलेंडर कंपनीची मोटर सायकल क्र. एम. एच.13 एक्स 8473 ने तलाठी श्री. अंदाने यांची भेट घेण्यासाठी मंडळ अधिकारी कार्यालय, सावरगाव येथे 11.46 वा. रवाना केले. त्याप्रमाणे मी व पंच क्रमांक 1 औरादकर असे मोटार सायकलने मंडळ अधिकारी कार्यालय, सावरगाव समोर जावुन तेथे मोटार सायकल बाजुला लावुन आम्ही मंडळ अधिकारी कार्यालयात गेलोत. तेव्हा तेथे तलाठी श्री. अंदाने हे खुर्चीवर बसलेले होते. त्यांना मी माझ्या खातेफोडच्या कामासंबंधी बोललो असता त्या कामासाठी त्यांनी माझेकडे 15,000/- रुपये लाचेची मागणी करुन 10,000/- रुपये लाच रक्कम घेण्यास संमती दर्शविली. त्यावेळी मी त्यांना आज मग करातो पैश्याच ऍडजेस्टमेंट, काटीला जावुन येतो असे म्हणुन त्यांचेपासुन मी व पंच क्र. 1 असे मोटार सायकलने सापळा पथक थांबलेल्या ठिकाणी 12.50 वा. परत आलोत. त्यानंतर पोशि/बेळे यांनी माझ्या जवळील व्हाईस रेकॉर्डर काढुन, बंद करुन संपते साहेबांकडे दिला. तेव्हा संपते साहेब यांनी मला थोडया अंतरावर बाजुला जावुन थांबण्याची सुचना केल्याने मी तेथे बाजुला जावुन थांबलो. त्यानंतर काही वेळाने मला संपते साहेब यांनी त्यांचेजवळ बोलावुन घेवुन हकीकत विचारली असता मी वरील प्रमाणे हकीकत सांगितली. त्यानंतर त्यांचे सुचनेवरुन पोशि/बेळे यांनी व्हॉईस रेकॉर्डर चालु करुन त्यामधील लाचमागणी संदर्भाने महत्वाचे संभाषण माझे व दोन्ही पंचासमक्ष ऐकले व संभाषणाबाबत मला व पंचांना विचारपुस केली. एकंदरीत तलाठी श्री. अंदाने यांनी माझी पत्नी व मुलगा यांचे नावे रजिष्टरी नोटरी केलेल्या संमतीपत्रा आधारे फेरफारला (खातेफोड) नोंद घेण्यासाठी माझेकडे 15,000/- रुपये लाचेची मागणी करुन 10,000/- रुपये लाच रक्कम घेण्यास संमती दर्शविल्याचे आम्हा सर्वांची खात्री झाली.

त्यानंतर संपते साहेब यांनी माझ्याशी, दोन्ही पंचांशी व सापळा पथक यांच्याशी विचारविनिमय करुन तलाठी श्री. अंदाने यांचेविरुध्द लाचेच्या सापळयाचे आयोजन करण्यात येणार असल्याचे सांगितले. मग त्यांनी कळविले की, लाचेच्या नोटांना अँथ्रासीन पावडर लावण्याची सापळापुर्व कार्यवाही करण्यात येणार आहे. त्यानंतर त्यांच्या सुचनेवरुन मी माझ्याजवळील सर्व रोख रक्कम व चिज वस्तु काढुन त्यांचेकडील खाजगी वाहनाचे सिटवर त्यांचेसमोर ठेवली. मग त्यांनी ऍन्थ्रासिन पावडर लावणे, ऍन्थ्रासिन पावडरचे उपयोग, गुणधर्म व ऍल्ट्राव्हायोलेट दिव्याचा उपयोग याबाबत आम्हास माहिती दिली. त्यानंतर त्यांचे सुचनेवरुन पोहेकॉ/ शेख यांनी मी तलाठी श्री. अंदाने यांना देण्यासाठी आणलेल्या 500 रुपये दराच्या 20चलनी नोटांना ऍंथ्रासीन पावडर लावुन त्या नोटांची खाजगी वाहनाचा दरवाजा व काचा बंद करुन कृत्रीम अंधारात ऍल्ट्राव्हायोलेटच्या लॅम्पने तपासणी करुन त्याचे सविस्तर प्रात्यक्षिक करुन दाखविले. त्यानंतर सदर नोटांची घडी पोहेकॉ/ शेख यांनी माझे पॅन्टचे समोरील उजवे बाजुचे खिशामध्ये अलगद ठेवुन दिली. त्यानंतर संपते साहेब यांनी तलाठी श्री. अंदाने यांनी लाचेची रक्कम स्विकारल्यानंतर डोळयांचा चष्मा डाव्या हाताने काढुन हातात धरणेबाबत ईशारा मला नेमुन दिला.

त्यानंतर संपते साहेब यांनी मला, दोन्ही पंचाना व सापळा पथकातील सदस्यांना सविस्तर सुचना दिल्या व नंतर त्यांच्या सुचनेवरुन पोशि/बेळे यांनी एक नवीन मेमरी कार्ड व्हॉइस रेकॉर्डरमध्ये टाकुन व्हॉईस रेकॉर्डर चालु करुन त्यामध्ये पुर्वीचे कोणतेही संभाषण रेकॉर्ड नसलेबाबत खात्री करुन दिली व त्यांनी माझे व तलाठी श्री. अंदाने यांचेत होणारे संभाषण व्हॉईस रेकॉर्डरमधील मेमरी कार्ड मध्ये रेकॉर्ड होणार असलेबाबत सांगितले. त्यानंतर पोशि/बेळे यांनी सदर व्हाईस रेकॉर्डर चालु करुन माझे शर्टचे आतमध्ये असलेल्या बनियनला पीनने लावुन मी व पंच क्र. 1 औरादकर असे माझेकडील हिरोहोन्डा स्पलेंडर कंपनीची मोटर सायकल क्र. एम.एच.13 एक्स 8473 ने तलाठी



Scanned with CamScanner

श्री. अंदाने यांची भेट घेण्यासाठी मंडळ अधिकारी कार्यालय, सावरगाव येथे 13.56 वा.रवाना झालोत. आमचे पाठोपाठ संपते साहेब व सापळा पथक असे त्यांचेकडील खाजगी वाहनाने रवाना झाले. मी व पंच क्रमांक 1 औरादकर असे मोटार सायकलने मंडळ अधिकारी कार्यालय, सावरगाव समोर जावुन तेथे मोटार सायकल बाजुला लावुन आम्ही मंडळ अधिकारी कार्यालयात गेलोत. तेथे मी तलाठी श्री. अंदाने यांना नमस्कार घालुन आपलं ठरल्याप्रमाणे 10,000/- रुपये आहेत, मोजुन घ्या असे म्हणुन माझे पॅन्टचे उजव्या खिशातील 10,000/- रुपये लाचेच्या रक्कमेची नोटांची घडी उजव्या हाताने काढुण तलाठी श्री. अंदाने यांचे समोर धरली असता त्यांनी ती उजव्या हाताने घेवुन "हो" म्हणुन त्यांचे अंगावरील शर्टचे डाव्या बाजुचे खिशात ठेवुन दिली. त्यानंतर मी कार्यालया बाहेर येवून मला नेमुण दिलेला इशारा केला, ती वेळ साधारणत: 14.16 वाजण्याची होती.
त्यानंतर संपते साहेब, पंच क्र. 2 पांडागळे व सापळा पथकातील पोलीस अंमलदार सदर ठिकाणी हजर आले. त्यानंतर संपते साहेब यांच्या सुचनेवरुन पोशि/बेळे यांनी माझ्याजवळील व्हाईस रेकॉर्डर काढून घेवुन तो बंद केला व संपते साहेब यांनी मला कार्यालयाचे बाहेरच थांबण्याची सुचना केली. त्यावरुन मी कार्यालयाचे बाहेरच थांबलो. त्यानंतर संपते साहेब यांनी कार्यालयात जावुन पुढील कामकाज केले व नंतर काही वेळाने त्यांनी मला तेथे बोलावुन घेतले व कार्यालयाच्या खिडक्या, दारे व लाईट बंद करुन केलेल्या कृत्रीम अंधारात माझ्या हाताची व पॅन्टचे समोरील उजव्या बाजुच्या खिशाची अल्ट्राव्हायलेट लॅम्पव्दारे तपासणी केली असता माझे उजवे हाताचे बोटाचे पेऱ्यावर व माझे पॅन्टचे समोरील उजवे बाजुचे खिशावर व आतील बाजुस ठिकठिकाणी अंथ्रासीन पावडरची हिरवट रंगाची चकाकी दिसुन आली.
त्यानंतर संपते साहेब यांनी आम्हा सर्वांसमक्ष तलाठी श्री. अंदाने यांना त्यांचे संपुर्ण नावा बाबत विचारपुस केली असता त्यांनी त्यांचे नाव रविंद्र दत्तात्रय अंदाने, वय 55 वर्ष, पद- तलाठी, सज्जा सावरगाव अतिरीक्त कार्यभार केमवाडी ता. तुळजापुर जि. उस्मानाबाद रा. गणपती मंदीर जवळ, 62 अ, वसंत नगर विजापुर रोड, सोलापुर जि. सोलापुर (वर्ग -3) असे असल्य

13. **Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2. (केलेली कारवाई: बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)**

(1) **Registered the case and took up the investigation: (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):**

**or (किंवा)**

(2) **Directed (Name of I.O.) (तपास अधिका-याचे नाव):**
RAMESH BHIVA GHULE
**Rank (पद):** SI (Sub-Inspector) **No.(क्र.):**
**to take up the Investigation (ला तपास करण्याचे अधिकार दिले) or (किंवा)**

(3) **Refused investigation due to (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):**

**or (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)**

(4) **Transferred to P.S. (गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):**

**District (जिल्हा):**
**on point of jurisdiction (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .**

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost. (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)**

**R.O.A.C.(आर. ओ .ए .सी.)**



Scanned with CamScanner

14 **Signature/Thumb impression of the complainant / informant.**
**(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):**

श्री पी व्ही राऊत

15. **Date and time of dispatch to the court**
**(न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):**

ठा. एच. फोर LHC/691
पोलीस ठाणे अंमलदार

**Signature of Officer in charge, Police Station**
**(ठाणे प्रभारी अधिका-याची स्वाक्षरी)**

**Name (नाव):** SACHIN ASHOK PAN
**Rank(पद):** SI (Sub-Inspector)
**No.(सं.):**

Scanned with CamScanner